# विरहाचे सुख

प्रिये तू नजरेआड होतेस न होतेस अन
मी टुणकन उडी मारून धावत सुटलो
गाडीची काच खाली करून तू आशेनं पाहिलंस
पण अधीरपणे मी दार बंद केले, माफ कर!

अगं तुला टेक्स्ट पाठवायचा होता त्वरित
तुझ्या भोवताली पिंगा घालताना चान्सच नसतो
फोनचा स्क्रीन कुरवाळतो तेव्हा वाटते
तुझ्याच गालांना बोटे गोंजारताहेत

तुझा विरह मला नवी चेतना देतो!
मी लॅपटॉपकडे झेपावतो, बॉसला टांग लावून
ईमेल पत्रे लिहितो, कीबोर्ड बडवत कंठ मोकळा करतो
जो तुझ्याशी लगट करताना चिडीचूप असतो

"तू काहीच बोलत नाहीस" तुझी कायम तक्रार
चॅटवर कोणाची वटवट जास्त असते तूच सांग!
वासॅपवर स्मायलींचा कल्लोळ कोणाचा असतो!
तू नसताना मी अपरिमित आनंदात असतो!

प्लीज तो फोन मात्र लावू नकोस प्रिये
डिजिटल जगात अंतराचा जाच होत नाही
पण कानाशी येतो जेव्हा तुझा जिवंत आवाज
तेव्हा मला खरे विरहाचे दुःख होते!

*By: Abhay B. Joshi*
*December 2012*